# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 04/11/2023 (शनिवार) सकाळ

---

## जबरी संभोग

पो.स्टे. कुही :– फिर्यादी/पिडीता ही आपले घरी एकटीच रात्री आराम करीत असतांना यातील **आरोपी नामे– कपील मोरेश्वर सोनटक्के वय ३१ वर्ष, रा. नागोबा खैरी पोस्ट नवेगाव ईसापुर ता. उमरेड जि. नागपुर** हा पिडीताच्या घरी मागच्या दाराची कडी काढुन आत प्रवेश करून पिडीताचे तोंड दाबुन तिला आवाज केल्यास मारण्याची धमकी देवुन पिडीते सोबत आरोपीने जबरी संभोग केला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. कुही येथे आरोपीविरुध्द कलम ३७६, ४४८, ५०६ भादंवी सहकलम ३(१)(i)(ii),३(२)(अ),३(२)(अ) अनुसुचित जाती जमाती अत्याचार प्रति. कायदा १९८९ सुधारीत कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. यातील आरोपीला अटक करण्यात आली असुन गुन्हयाचा पुढील तपास उपविभागीय पोलीस अधिकारी उमरेड विभाग श्री. राजा शेरसिंग पवार मो. नं. ९८२३५५५६२६ हे करीत आहे.

## घरफोडी

पो.स्टे. कन्हान :– अंतर्गत ०९ कि. मी. अंतरावरील मौजा बोरी सिंगारदिप कन्हान पारशिवनी येथे फिर्यादी नामे– रामभाउ विठोबाजी नागपुरे, वय ६० वर्ष, रा. बोरी सिंगारदिप कन्हान हे दिनांक ०२/११/२०२३ चे रात्री ०९/०० वा. दरम्यान सर्वजण जेवन करून रात्री ११/०० वा. सर्व घराचे दरवाजाचे कोंडा कडी लावून झोपी गेले. त्यानंतर फिर्यादी दिनांक ०३/११/२०२३ चे मध्यरात्री ०३/०० वा. बाथरूम करण्याकरीता उठले असता तेव्हा घराचा मागचा दरवाजा उघडा दिसला व किचनचा दरवाजा सुध्दा उघडा दिसला तेव्हा फिर्यादीला समजले की त्याच्या घरात चोरी झालेली आहे. नंतर फिर्यादीने घरातील सर्व सदस्यांना जागे केले नंतर फिर्यादी व सर्वांनी बघीतले की, किचनरूम मधील गोदरेजची अलमारीचे लॉक तुटलेले दिसले लॉकर मध्ये बघीतले तेव्हा त्यामध्ये ठेवेलेले सोन्याचे दागीने पावने पाच तोळयाची सोन्याची पोत जुनी वापरती किंमती अंदाजे १,४२,५००/– रू २) १.५ ग्रॅमची सोन्याची पोत किंमती अंदाजे ४५०००/–रू. ३) ६ ग्रॅम सोन्याचे कानातले टॉप्स किंमती अंदाजे १८०००/– रू. ४) ४ ग्रॅम सोन्याची चैन १२०००/–रू. ५) १ ग्रॅमचे सोन्याचे मनगटे किंमती अंदाजे ३०००/–रू. किंमती २२०५००/– रू. व १०० ग्रॅम चांदीच्या जुन्या वापरत्या पायपट्टया किंमती ४०००/– रू. व नगदी ३०००/– रू. कॅश किंमती २२७५००/– रूपयाचा मुद्देमाल कोणीतरी अज्ञात चोराने मागच्या दरवाजाचे कोंडा कडी तोडून आत प्रवेश करून गोदरेजची आलमारीतील सोन्याचांदीचे दागीने व नगदी असा एकुण किंमती २२७५००/– रूपयाचा मुद्देमाल कोणीतरी अज्ञात चोराने चोरून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन कन्हान येथे आरोपीविरुध्द कलम ४५७, ३८० भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. अज्ञात आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास सफौ. सदाशिव काटे मो. क्र. ९०११३२६७९३ हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर